Estd. 1962
"A++" Accredited by NAAC (2021) With CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

१४/२०२५

सर्व अधिविभागप्रमुख व प्रशासकीय विभागप्रमुख यांना कळविण्यात येते की, ०८ मार्च रोजीच्या आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठातील स्त्री अभ्यास केंद्र, बेटी बचाओ अभियान, कै.श्रीमती शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासन, अंतर्गत तक्रार समिती, लेडीज हॉस्टेल व विद्यार्थी विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवार **दि.०५ मार्च, २०२५ रोजी** सकाळी १०.०० ते दुपारी ४.०० वा. पर्यंत **"महिलांचे शैक्षणिक आणि प्रशासकीय योगदान"** या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात येत आहे.

सदरच्या एक दिवसीय कार्यशाळेस शिवाजी विद्यापीठातील सर्व महिला शिक्षक, शिक्षकेत्तर महिला अधिकारी/कर्मचारी तसेच रोजंदारी/हंगामी महिला कर्मचाऱ्यांनी सहभागी व्हावे. सदरच्या कार्यक्रमास राजर्षी शाहू सभागृह, मुख्य प्रशासकीय इमारत येथे सकाळी १०.०० वाजता नांव नोंदणी करावयाची असून, सहभागासाठी कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

कुलसचिव

जा.क्र.आस्थापना/ 462
दिनांक : 04 MAR 2025

प्रति,

१. सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक
२. सर्व उपकुलसचिव, कायदा अधिकारी, जनसंपर्क अधिकारी, सहा.कुलसचिव व समकक्ष अधिकारी
३. सर्व प्रशासकीय विभागप्रमुख
४. मा.कुलगुरु/प्र-कुलगुरू/कुलसचिव/संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ/वित व लेखा अधिकारी, यांचे कार्यालयास माहितीसाठी.
५. इंटरनेट सेल - सदरचे परिपत्रक संकेतस्थळावर प्रसिध्द करावे. (INTRANET)

**सदरचे परिपत्रक आपल्या विभागातील सर्व महिला शिक्षक व प्रशासकीय महिला सेवकांच्या निदर्शनास आणावे.**